# पुणे विद्यापीठ

महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ,
पुणे विद्यापीठ,
पुणे–४११००७.

दुरध्वनी क्रमांक:
(०२०) २५६०१२५५

संदर्भ क्र.: पुवि/म.वि.वि.मं/५०

दिनांक: १२.०२.२०१३

अतितात्काळ

प्रति,
मा.प्राचार्य /संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व
सर्व मान्यताप्राप्त संस्था

**विषय : पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती सादर करणेबाबत.**
**संदर्भ : मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे कार्यालयात दि. ११.०२.२०१३ रोजीची बैठक.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सोबत दुष्काळग्रस्त गावांची यादी जोडण्यात आलेली आहे. सदरच्या दुष्काळग्रस्त गावांमधील आपल्या महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र इ. या सर्व अभ्यासक्रमातील पदव्युत्तर अभ्यासक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती http://pg.dhepune.info/ या संकेतस्थळावर दि.१३.०२.२०१३ पर्यत न चुकता भरावी.

तसेच सदर विद्यार्थ्यांची माहिती एक प्रत नॅक व सांख्यिकी कक्ष, पुणे विद्यापीठ येथे खास दुतामार्फत दि. १४.०२.२०१३ पुर्वी सादर करावी. सदरची माहिती शासनास उपरोक्त मुदतीत सादर करावयाची असल्याने प्रथम प्राधान्याने माहिती पाठविण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

कळावे.

संचालक
म.वि.वि.मं.